# विज्ञानप्रेमी प्रसन्न व्यक्ती डॉ रा.वि. साठे www.mngogate.com लेख M19(1Apr2006)

प्रतिकूल परिस्थितीमुळे मॅट्रिकचेही शिक्षण न झालेले माझे वडील श्री नारायण रघुनाथ गोगटे कोकणातून मुंबईत आले. कष्टपूर्वक त्यांनी आपला उत्कर्ष केला. एक उल्लेखनीय भाग म्हणजे त्यांचा कित्येक विद्याविभूषित नामवंतांशी स्नेह झाला. त्यांपैकीच एक म्हणजे डॉक्टर रामचंद्र विश्वनाथ साठे. गिरगाव हा तेव्हा मराठी संस्कृतीचा बालेकिल्ला होता. ऑपेरा हाऊस येथे एके काळी ट्रॅम टर्मिनस होते. त्याजवळ दामोदर (नंतर नगीनदास) मॅन्शन येथे तिसऱ्या मजल्यावर एका ब्लॉकमध्ये (तेव्हा फ्लॅट शब्द प्रचारात नव्हता) डॉ साठे यांचा निवास होता. पहिल्या मजल्यावर त्यांचे चिकीत्सालय होते. योगायोग असा की 1942 पर्यंत त्याच ब्लॉकमध्ये आम्ही रहात होतो व नंतर जरा दूर राहू लागलो. तेथे माझ्या वडलांना भेटायला डॉ. साठे आल्याचे मला स्मरते.

1948 मध्ये मी 16 वयाचा मॅट्रिक (त्यानंतर एस.एस.सी आली) झाल्याचे वडीलानी पाहिले आणि लवकरच त्यांचे निधन झाले. आई अगोदरच गेली होती. पण आमचे डॉ साठे कुटुंबाशी संबंध टिकून राहिले. त्याला आणखीही कारणे झाली. माझे एक वडील बंधु डॉक्टर झाले. दुसरे वडील बंधु बिझनेसमन होते. त्याशिवाय ते मुंबई विद्यापीठ व काही सामाजिक संस्थांमध्ये महत्त्वाचे कार्यकर्ते होते. त्या दोघांचाही कधीकधी डॉ साठे यांच्याशी संपर्क येत असे. दोघेही बंधु हयात नसल्याने मी निश्चित सांगू शकत नाही. डॉ साठे यानी प्रा. सोनोपंत दांडेकर यांची कीर्तने केम्प्स कॉर्नरजवळील लक्ष्मीनारायण मंदिरात वेळोवेळी आयोजित केली. तेव्हा आम्हास निमंत्रण मिळत असे. एकदा मी तेथे गेल्याचे स्मरते. डॉ साठे यानी आम्हा सर्व भावांना सपत्नीक त्यांच्या घरी कधीतरी जेवायला बोलावले होते. आम्ही एके काळी रहात असलेला ब्लॉक पाहून मजा वाटली.

काही वर्षे मुंबई मराठी साहित्य संघात मी शास्त्रीय साहित्यविषयक कार्य केले. पुढे मी व अन्य काही समविचारी मंडळीनी मराठी विज्ञान परिषद ही संस्था स्थापन करावी असे ठरवले. त्यासाठी एका ज्येष्ठ विज्ञानपंडितास स्थापनासभेचे अध्यक्ष म्हणून बोलवावे असे ठरले. मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरुपदावरून नुकतेच निवृत्त झालेले डॉ. साठे यांचे नाव त्यासाठी डॉ श्री. शां. आजगावकर यानी सुचवले. डायबेटिक असोसिएशनच्या कार्यासाठी हे दोन्ही डॉक्टर एकत्र येत असत. मी डॉ साठे यांना चिकीत्सालयात भेटलो व विनंती केली. त्यानी होकार दिला.

24 एप्रिल 1966 रोजी साहित्य संघात स्थापनेची सभा झाली, तेव्हापासून मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष डॉ साठे व मी कार्यवाह असे एक नाते झाले. डॉक्टरांचा मला सदैव आशीर्वाद व पाठिंबा होता. काही आपुलकीने ते माझ्याकडे पहात असत. मी त्यांच्या मित्राचा मुलगा होतो. मला शालेय मुलगा म्हणूनही त्यानी पाहिले होते. पुण्यात इंजिनिअरिंगची पदवी मला 1953 मध्ये मिळाली. तेथे असताना काही काळ प्रा साठे नावाचे उपप्राचार्य होते. त्यांना भेटलो नव्हतो. दुरून एक नीटनेटके गृहस्थ एवढ़ीच ओळख. डॉ साठे यांचे ते बंधु होते हे मला 1966 मध्ये समजले.

डॉ साठे 1966 ते 1976 या काळात दहा वर्षे अध्यक्ष होते. त्यानंतर सहा वर्षे तो बहुमान मला मिळाला. वेळोवेळी निवडणूकी होत असत. प्रत्येक वेळी डॉक्टर सांगायचे की अन्य कुणी तयार असेल तर ते बाजूस होण्यास तयार आहेत. पण डॉक्टर उपलब्ध असताना, व त्यांच्या नावामुळेही नवोदित मराठी विज्ञान परिषदेला प्रतिष्ठा मिळत आहे हे दिसत असताना तो विचारही कुणाला स्पर्श करीत नसे. पण डॉक्टर हे नावापुरते अध्यक्ष नव्हते. कार्यकारिणीच्या कित्येक सभा त्यांच्या चिकीत्सालयात सायं आठच्या सुमारास होत असत. त्यांचे प्रसन्न व मृदुभाषी व्यक्तीमत्त्व असल्याने सभा छान पार पडत असत. दरवर्षी परिषदेचे मराठी विज्ञान संमेलन भरत असते. पहिल्या नऊ संमेलनांना ते आवर्जून उपस्थित होते. गावोगावी त्यांचे चाहते होते, काही शिष्य होते. त्याशिवाय परिषदेच्या वार्षिक साधारण सभा भरत, त्यांसही ते अध्यक्ष म्हणून लाभत असत.

वयामुळे डॉक्टर थकल्याचे दिसत होते. त्यांना एक विश्वस्त म्हणून निवडण्यात आले होते. परिषदेची कधीना कधी वास्तु होणार याची चाहूल लागल्याने घटनादुरुस्ती करून विश्वस्तांची पदे निर्माण झाली होती. विश्वस्तमंडळाच्या सभाही त्यांच्या चिकीत्सालयात होत असत. पण प्रकृतीच्या कारणाने त्या पदाचाही त्यानी राजीनामा दिला. खेदाची गोष्ट अशी की विज्ञानभवनाचा पहिला टप्पा त्यानी पाहिला नाही. ते हयात होते पण प्रकृती साथ देत नव्हती. जमीन मिळवणे, अनुदाने मिळवणे अशा काही कार्यासाठी शासनाकडे खेपा घालाव्या लागतात. त्यांच्या नेतृत्वाखाली परिषदेची शिष्टमंडळे काही मंत्रीजनांना भेटायला गेली होती. डॉक्टरांचे निधन झाल्यावर 4 सप्टेंबर 1983 रोजी परिषदेच्या विज्ञान भवनात (पुरव मार्ग, मुंबई 400022) परिषद व डायबेटिक असोसिएशन यानी शोकसभा घेतली. त्यात डॉ श्री शां आजगावकर, प्रा भा मा उदगावकर, डॉ अ. ना. गोगटे, डॉ अरविंद गोडबोले व मी यांची भाषणे झाली. ऑक्टोबर 1983 च्या मराठी विज्ञान परिषद पत्रिकेच्या मुखपृष्ठावर त्यांचे चित्र व आत एक संपादकीय आदरांजली आहे. 28 नोव्हेंबर 1983 रोजी मुंबईचे शेरिफ श्री सोहराब गोदरेज यानीही एक शोकसभा घेतली होती.

डॉ साठे यांच्या नावे एक स्मृती पारितोषिक परिषदेतर्फे दिले जाते. परिषदेने त्यांना जिवंतपणीही मानवंदना दिली. 24 एप्रिल 1973 रोजी परिषदेच्या वर्धापनदिनी त्यांना सन्मान्य सभासदत्व समारंभपूर्वक देण्यात आले. अध्यक्षांचाच बहुमान होत असल्याने सन्मानपत्रावर उपाध्यक्ष प्रा. चिं. श्री कर्वे यानी सही केली. 2005 मध्ये डॉ रा. वि. साठे यांची जन्मशताब्दी असल्याने एक स्मरणग्रंथ प्रसिद्ध होईल. डॉ रा. वि. साठे यांच्या स्मृतीस माझे अभिवादन.

-- मधुकर ना. गोगटे (पुणे)(1997 पर्यंत मुंबईकर) <u>पूर्वप्रसिद्धी</u> (नोव्हेंबर 2005) Memoirs of Dr R V Sathe 1905-2005 इंग्रजी मराठी ग्रंथ. संकलक डॉ एस आर साठे (मानद डीन) रहेजा हॉस्पिटल, माहीम, मुंबई 400016 डॉ रा. वि साठे (पूर्वाध्यक्ष वर्ल्ड मेडिकल असोसिएशन) यांच्या वैद्यकीय / अन्य कार्यावर काही लेख. लेखकसंपर्क वेबसाईट इंडेक्सपानावर